# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिति *
## कार्यपत्रिका क्रमांक २७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि. ३/१०/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिति सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १२११**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. १९/९/२०१८ चे पत्र.

स्थायी समिती विषय क्र. १०९२ पुणे शहरात रात्र निवारा प्रकल्प राबविणे या विषयाचा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्र. १२१२**

मा.सौ.दिशा माने यांचे दि. २५/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं CE26A336/SU1-800, प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी प्रकल्प राबविणे | ५० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी सहकारनगर नं १ परिसर प्रकल्प राबविणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी सहकारनगर नं २ परिसर प्रकल्प राबविणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी तळजाई पठार व पद्मावती परिसर प्रकल्प राबविणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी पुणे सातारा रोड व परिसर(पंचवटी ते अहिल्यादेवी चौक) प्रकल्प राबविणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र ३५ अ मधील ऑक्सिजन पार्क करणेसाठी शिवदर्शन तावरे व शाहू कॉलेज रोड परिसर प्रकल्प राबविणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १२१३**

मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. २६/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ८ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, झेडई१६बी१०२/एसडी२-१७१४, प्रभाग क्र. ८ अ औंध रोड गणपती मंदिर ते चेतना सोसायटी पर्यत ड्रेनेज लाईन टाकणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ८ अ मधील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे, जेटींग मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे व चेंबर साफसफाई करणे व अनुषंगिक कामे करणे (भाग-१) | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. ८ अ मधील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे, जेटींग मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे व चेंबर साफसफाई करणे व अनुषंगिक कामे करणे (भाग-२) | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १२१४**

मा.सौ.मनिषा लडकत यांचे दि. २६/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक | | |
| १) बजेट कोड : CE22A548/SJ10-988, प्रभाग क्र.१९ ब भवानी पेठ जुनी रामोशी गेट पोलिस चौकीसमोरील पालखी मार्ग रस्त्यावरील कमान ऐतिहासिक पुरातन भवानीमाता मंदिर सुशोभिकरण कमान करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| २) बजेट कोड : CE22A548/SJ10-989, प्रभाग क्र.१९ ब मधील जुना मोटर स्टॅन्ड चौकामध्ये ऐतिहासिक व पुरातन बालाजी मंदिर सुशोभित कमान करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| ३) बजेट कोड : CE20A102/SA2-1303, प्रभाग क्र.१९ ब मधील लोहियानगर काशेवाडी येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे | २० लाख | --- |
| ४) बजेट कोड : ZE16A104/SP2-1656, प्रभाग क्र.१९ ब मधील विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे | २० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र.१९ ब मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र.१९ ब मध्ये विविध ठिकाणी समाज मंदिर दुरूस्ती करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.१९ ब मध्ये मनपाच्या शाळा व पोलिस चौकीत संगणक पुरविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.१९ ब मध्ये थर्माप्लास्ट पेंट मारणे व ट्रॅफिक विषयी कामे करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.१९ ब मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे व गाळ काढणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.१९ ब मध्ये पाणीपुरवठा विषयक दैनंदिन देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १२१५**

मा.सौ.वृषाली चौधरी व मा.सौ.रुपाली धाडवे यांचे दि. २६/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३१क, मधील ओला व सुका कचरा गोळा करणेसाठी टिप्पर ७०९ गाडी खरेदी करणे व त्यापोटी देखभाल व दुरूस्ती करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, Pedestrian Policy नुसार शहरातील फूटपाथ विकसित करणे, पान क्र.१८०, अ.क्र.२२२, ( य़ादी क्र.एसए१३)<br>१)प्रभाग क्र.३१क, मधील विविध ठिकाणी फुटपाथ करणे. | १० लाख | --- |
| शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे.पान क्र.२०५,अ.क्र.६९२ (यादी क्र.एसए १५ )<br>२) प्रभाग क्र.३१क, मधील तपोधाम परिसरात रस्ता ट्रिमिक्स पध्दतीने कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ३) पान क्र.२०५, अ.क्र.६९७, प्रभाग क्र.३१क, मधील विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र.३१क, मधील ओला व सुका कचरा गोळा करणेसाठी टिप्पर ७०९ गाडी खरेदी करणे व त्यापोटी देखभाल व दुरूस्ती करणे. | --- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १२१६**

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता व मा.अजय खेडेकर यांचे दि. २७/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ क मधील श्रीमंत भैरवसिंग घोरपडे उद्यान घोरपडे पेठ येथील विविध विकास कामे करणे, दुरूस्ती विषयक कामे करणे व सुशोभिकरण करणेसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट हेड – सीई२६ए३३६/एसयु-७३८, प्रभाग क्र. २८ ब मध्ये स.नं. ४३८ येथील उद्यानांमध्ये उद्यान विषयक विकास कामे करणे व दुरूस्ती विषयक कामे करणे व सुशोभिकरण करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १८ क मधील श्रीमंत भैरवसिंग घोरपडे उद्यान घोरपडे पेठ येथील विविध विकास कामे करणे, दुरूस्ती विषयक कामे करणे व सुशोभिकरण करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १२१७**

मा.सौ.सुलोचना कोंढरे व मा.सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि. २७/९/२०१८ चे पत्र.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील राजूरी या ग्रामपंचायतीने प्राणाची बाजी लाऊन देशाची अहोरात्र सेवा करणा-या आजी व माजी सैनिकांना घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला या बद्दल राजुरी गावचे सरपंच डॉ. अमोल दुरंडे व ग्रामपंचायती मधील सर्व सदस्यांचे अभिनंदन...!

अशाच प्रकारचा निर्णय पुणे म.न.पा ने घेऊन म.न.पा च्या हद्दीत असणा-या आजी माजी सौनिकांची घरपट्टी (प्रोपर्टी टॅक्स) माफ करावी.

**विषय क्र. १२१८**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २७/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १ क मध्ये धानोरी लोहगाव परिसरात पिण्याचे पाण्याचे टँकर पुरविणेसाठी र.रु.५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. ३४, अ.क्र. ९, झेडई१६अे१०४/एसपी२-१५०९, प्रभाग क्र. १ क (कळस धानोरी) परिसरातील शाळा दवाखाने उद्यानामध्ये वॉटर प्युरीफायर यंत्रणा बसविणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १ क मध्ये धानोरी लोहगाव परिसरात पिण्याचे पाण्याचे टँकर पुरविणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. १२१९**

मा.सौ.मंगला मंत्री व मा.सौ.शितल शिंदे यांचे दि. २७/९/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २१ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, सीई२०सी३५२/एसबी५-१४३४, प्रभाग क्र. २१ क मध्ये विविध उद्यानात डेकोरेटिव्ह विद्युत पोल बसविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. २१ क मधील राजमाता जिजाऊ क्रिडा संकुल येथील जलतरण तलावाच्या वरच्या हॉलमध्ये वायरिंग व विद्युत व्यवस्था करणे. | --- | ५ लाख |
| २) प्रभाग क्र. २१ क मधील सेंट जोसेफ शाळा, घोरपडी गाव मध्ये प्रोजेक्टर बसविणे | --- | ३ लाख |
| ३) प्रभाग क्र. २१ क मधील महात्मा फुले मनपा शाळेमध्ये प्रिंटर पुरविणे व बसविणे | --- | २ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १२२०**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/८/२०१८ ते ३१/८/२०१८ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–४/५११ दि.२१/९/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १२२१**

निविदा क्र.४६/१६ एल.ई.डी.प्रकल्पातील मे.टाटा प्रोजेक्ट लि. यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे नावे केलेल्या करारनाम्यास व त्यापोटी त्यांना अदा केलेल्या बिलाबाबत, बिल अदा करण्यासाठी पेमेंट रिझर्व A/C ( Payment reserve account) मे.कोटक महिंद्रा बँकेमध्ये उघडण्यात आले असुन व त्या A/C मध्ये अगाऊ बिलापोटीचे जमा करण्यात आलेल्या र.रू. २४,२९,८६,७१५/– च्या प्रक्रियेस व या पुढील कालावधीत पुणे मनपा हद्दीमध्ये करावयाच्या प्रकाश व्यवस्थेच्या कामी निविदा अटी व शर्तीनुसार या निवेदनातील अ.क्र १ते ४ नुसार कार्यवाही करणेची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/५३१ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१) प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी मा.स्थायी समिती यांची ठराव क्र १२०४ दि.०६/०९/२०१६अन्वये मे.टाटा प्रोजेक़्ट लि. यांचे निविदेस व सदर निविदेमधील अटी शर्तीनुसार १२ वर्षे देखभाल व दुरूस्तीची कामे करून घेण्यास मान्यता मिळाल्यानंतर विद्युत विभागाने निविदा अटी व शर्ती सेक्शन २ मधील क्लॉज २.५ नुसार मे.टाटा प्रोजेक्ट लि.यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे नावे केलेल्या करारनामा केला असून त्यापोटी त्यांना बिल अदा करण्यात येत आहे.

२) या कामामध्ये ठेकेदार मे.टाटा प्रोजेक्ट लि.यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे बिल अदा करण्यासाठी निविदा अटी व शर्ती सेक्शन ३ मधील क्लॉज ५ नुसार पेमेंट रिझर्व A/C ( Payment reserve account) मे.कोटक महिंद्रा बँकेमध्ये उघडण्यात आले असुन त्या A/C मध्ये अगाऊ बिलापोटीचे र.रू. २४,२९,८६,७१५/– जमा करण्यात आले आहे व सदर जमा रक्कम मेंटेन करुन IMP&VP च्या प्रोटोकॉलमध्ये देण्यात आलेल्या एनर्जी सेव्हिंगच्या सुत्रानुसार दरमहा एनर्जी सेव्हिंगची बिले याच खात्यातून देण्यात येत आहे.

३) मा.प्रधान महालेखाकार(लेखा परीक्षा)–१ महाराष्ट्र यांचे कार्यालयामार्फत निविदा क्र–४६/२०१६ एल.ई.डी. प्रकरणाचे लेखा परीक्षण करण्यात आले असून सदर लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झाले असून सदरचा अहवाल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेले आहे.

४) मा.मुख्य लेखा परीक्षक, पुणे मनपा यांनी सुध्दा एल.ई.डी. प्रकल्पाचे लेखा परीक्षण मा.मुख्य सभेच्या आदेशानुसार केलेले असून सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाले असून सदरचा अहवाल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेले आहे.

**विषय क्र. १२२२**

मध्यवर्ती भांडार विभागाकडील दि. १/९/२०१८ ते १५/९/२०१८ या कालावधीमधील सविंदा करार व अन्य तद्अनुषंगिक माहिती महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/५३३ दि.२६/९/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १२२३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१६ ते ३१ ऑगस्ट २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–५/५३४ दि.२६/९/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १२२४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१ ते १५ ऑगस्ट २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–५/५३५ दि.२६/९/२०१८ चे पत्र.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्र. १२२५**

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या प्रस्ताव व प्रकल्पाच्या अद्ययावत माहिती व औंध, बाणेर आणि बालेवाडीच्या क्षेत्र वाढीबाबत मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०१ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/उआ(वि)/५२८ दि.२५/९/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्र. १२२६**

उरुळी–फुरसुंगी कचरा डेपो येथे १००० मे.टन क्षमतेच्या बायो मायनिंग प्रक्रिया प्रकल्प उभारणे व देखभाल दुरुस्ती करणे (बी–२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.भूमी ग्रीन एनर्जी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दर र.रुपये ६४६/– प्रति मे.टन या दराने चार वर्षे मुदतीसाठी टेंडर र.रुपये ५८,१४,००,०००/– पर्यंत उपलब्ध होणाऱ्या तरतुदी नुसार काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घ.क.व्य.का./५२१ दि. २५/९/२०१८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १२२७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ मध्ये सुधारीत राजपत्रानुसार खालील प्रमाणे बदल झालेला आहे.

१. ६०० चौ. फूटपर्यंतचे निवासी अनाधिकृत बांधकामास शास्तीची कर आकारणी न करणेस.
२. ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंत चे निवासी अनाधिकृत बांधकामास प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दराने शास्तीची कर आकारणी करणेस.
३. १००१ चौ. फुटापुढील निवासी अनाधिकृत बांधकामास प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्तीची कर आकारणी करणेस.

उपरोक्त प्रमाणे नमूद चौ. फुटा पर्यंतचे निवासी बांधकामास शास्तीची आकारणी करण्याबाबत दुरुस्ती आली असल्याने, याप्रमाणे दिनांक ०४.०१.२००८ पासून वरील अ.क्र. १ व २ मधील नमूद चौ. फुटा पर्यंतचे निवासी बांधकामास दुप्पटी इतकी शास्तीची आकारणी करण्यात आलेली आहे. त्यांना मा. मुख्य सभा मान्यता दिलेल्या दिनांकापासून सुधारित दराने शास्ती आकारण्यास.

वर नमूद केलेले बदल विचारात घेता कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना योग्य ती सवलत (Relief) देण्यात येत आहे. तसेच मान्यता प्राप्त नकाशाप्रमाणे बांधकाम झालेले असल्यास, खात्याचा अभिप्राय घेवून तीनपट शास्ती लावण्यात येत नाही. त्यामुळे सद्यस्थिती प्रमाणे कार्यवाही चालू राहिल्यास अनाधिकृत बांधकामास आळा घालणे शक्य आहे.

तथापि, कलम २६७ अ मध्ये झालेले वरील बदलाबाबतचे अधिकार मा. मुख्य सभेस असल्याने, सदरची बाब मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४९७ दि.१४/९/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२५/९/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १२२८**

श्री.मुलाणी इसाक बाबुलाल, लघुलेखक, प्राथमिक शिक्षण विभाग यांचे वेतनश्रेणीबाबत मा.योगेश समेळ व मा.अविनाश बागवे यांचे दि. २/५/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२ दि. २/५/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/७५१ दि.५/१/२०१८ ने पाठविलेल्या अभिप्रायावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२४ दि. १६/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/४६२ दि.१०/९/२०१८ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२५/९/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १२२९**

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये डीबीटी योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या काही साहित्यासाठी कमी पडणारी रक्कम वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करुन देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्रा)/५१६ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१) मध्यवर्ती भांडार विभाग, पुणे मनपा यांनी दिलेल्या इयत्ता ५वी - १११६, ६वी - ११४० ७वी-११६४ व ८वी - ११८८ या मुलांच्या नविन दरानुसार रक्कम विद्यार्थ्यांच्या/ पालकांच्या बँक खात्यामध्ये जमा करणेस तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या बँक खात्यामध्ये प्रत्यक्ष यापूर्वी जुन्या दराने गणवेशाची रक्कम जमा झालेली आहे त्यांच्या बँक खात्यामध्ये उर्वरीत फरकाची रक्कम जमा करणेस

२) एकूण वर्गीकरणाची रक्कम रूपये २,०५,१९,३५९/- पैकी विद्यार्थी गणवेश - र.रुपये १,७९,७३,६४८/- इतकी रक्कम जादा आवश्यक असून त्यासाठी डीबीटी योजनेमधील १.विद्यार्थी दप्तरे (आरई१२ए११४डी) - र.रुपये १०,९०,६८६/- २.चित्रकला साहित्य (आरई१२ए११५बी) - र.रुपये २२,६३,५९७/- ३.लेखन साहित्य व पाट्या खरेदी (आरई१२ए११५सी) - र.रुपये ७६,५५,३९०/- ४.बनियन पेटीकोट (आरई१२ए११६बी) - र.रुपये ३,४२,८३२/- ५. स्वेटर खरेदी (आरई१२ए१३६) - र.रुपये ४४,१८,८५४/- मधील र.रुपये १८,७३,१४३/-, ६. मॉडेल स्कूलसाठी (आरई१२ए१३७) मान्य रक्कम रूपये ४,५५,४०,०००/-या अर्थशिर्षकातील रकमेतून रक्कम रूपये ४७,४८,०००/- रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध करणेस

३) तसेच उर्वरीत साहित्यासाठी १.विद्यार्थी बूट मोजे - र.रुपये २१,५८,३७०/- २.विद्यार्थी वहया (आरई१२ए११५ए) - र.रुपये ३,०७,९४१/- ३.विद्यार्थी ट्रॅकसूट व बूट (आरई१२ए११७सी) - र.रुपये७९,४००/- अशी जादा आवश्यक रक्कम रूपये २५,४५,७११/- डीबीटी योजनेमधील स्वेटर खरेदी (आरई१२ए१३६) र.रुपये ४४,१८,८५४/- या अर्थशिर्षकातील शिल्लक रकमेमधून विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करणेस

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, प्राथमिक शिक्षण विभाग, | | |
| १) विद्यार्थी दप्तरे - आरई१२ए११४डी | १०,९०,६८६/- | ---- |
| २) चित्रकला साहित्य - आरई१२ए११५बी | २२,६३,५९७/- | ---- |
| ३) लेखन साहित्य व पाट्या खरेदी - आरई१२ए११५सी | ७६,५५,३९०/- | ---- |
| ४) बनियन पेटीकोट - आरई१२ए११६बी | ३,४२,८३२/- | ---- |
| ५) मॉडेल स्कूलसाठी - आरई१२ए१३७ | ४७,४८,०००/- | ---- |
| ६) स्वेटर खरेदी - आरई१२ए१३६ | ४४,१८,८५४/- | ---- |
| नविन सुचवलेली कामे | | |
| प्राथमिक शिक्षण विभाग | | |
| | ---- | १०,९०,६८६/- |
| | ---- | २२,६३,५९७/- |
| १)विद्यार्थी गणवेश - आरई१२ए११४ए | ---- | ७६,५५,३९०/- |
| | ---- | ३,४२,८३२/- |
| | ---- | ४७,४८,०००/- |
| | ---- | १८,७३,१४३/- |
| २) विद्यार्थी बूट मोजे - आरई१२ए११४सी | ---- | २१,५८,३७०/- |

| | | |
|---|---|---|
| ३) विदयार्थी वहया – आरई१२ए११५ए | ---- | ३,०७,९४१/- |
| ४) विदयार्थी ट्रॅकसूट व बूट – आरई१२ए११७सी | ---- | ७९,४००/- |

**विषय क्र. १२३०**

पुणे पेठ घोरपडे सि.स.नं. ३३४,३३५/१,३३६ फा.प्लॉट नं. १४५,१५५,१४९ येथील महात्मा गांधी विद्यालय, मनपा शाळा क्र. ६७ बी येथील तळमजल्यावरील ३ वर्ग खोल्यांमध्ये स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने संयुक्त प्रकल्प राबविणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली असता तीन स्वयंसेवी सस्थांनी प्रस्ताव दाखल केलेले असून पात्र स्वयंसेवी संस्था एव्हरग्रीन एज्युकेशन सोसायटी यांचेकडून संयुक्त प्रकल्प राबविणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सविवि/५१७ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१. पुणे पेठ घोरपडे सि.स.नं. ३३४,३३५/१,३३६ फा.प्लॉट नं. १४५, १५५, १४९ येथील महात्मा गांधी विद्यालय, मनपा शाळा क्र. ६७ बी येथील तळमजल्यावरील ३ वर्ग खोल्या एव्हरग्रीन एज्युकेशन सोसायटी या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने संयुक्त प्रकल्प अंतर्गत गरीब घरातील पुरूष व महिलांच्या सक्षमीकरणाकरीता मोफत शिलाई मशिन्सचे प्रशिक्षणाकरीता वापरणेस देण्यास.
२. सदर संयुक्त प्रकल्प पाच वर्षे कालावधी करीता एव्हरग्रीन एज्युकेशन सोसायटी, न्यु गुरूवार पेठ, पुणे–४२ संस्था, समाज विकास विभाग व शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका यांचे सहकार्याने सदर प्रकल्प राबविणेस व दरवर्षी या संस्थे समवेत करारनामा करणेस.
३. सदर संयुक्त प्रकल्प राबविणेचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देणेस अथवा मा. महापालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास देणेस.
४. सदर संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार मा. उप आयुक्त समाज विकास विभाग व मा. प्रशासकिय अधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपलिका यांना देणेस.

**विषय क्र. १२३१**

उरुळी – फुरसुंगी कचरा डेपो येथे १००० मे. टन क्षमतेचा बायो मायनिंग प्रक्रिया प्रकल्प उभारणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामाकरिता मे. भूमी ग्रीन एनर्जी यांचेकडून त्यांचे टेंडर दर र.रु. ६४६/– प्रति मे. टन या दराने टेंडर रक्कम रु. ५८,१४,००,०००/- (र.रु. अठ्ठावन्न कोटी चौदा लक्ष रुपये) पर्यंत काम करुन घेणेस आर्थिक वर्ष सन २०१८–१९ मध्ये तरतूद कमी असलेमुळे व टप्प्याटप्प्याने उर्वरीत तरतूद उपलब्ध होणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार कार्यवाही होणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/५२० दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार निविदाधारकास प्रस्तावित बायोमायनिंगच्या कामाच्या अनुषंगाने सन २०१९–२०२०, २०२०–२०२१ व २०२१–२०२२ या तीन आर्थिक वर्षात र.रुपये १४,५३,५०,०००/- प्रती वर्षी व सन २०२०–२०२३ या आर्थिक वर्षासाठी र.रु.८,७२,१०,०००/– याप्रमाणे सदरच्या चार आर्थिक वर्षनिहाय एकूण र.रु. ५२.३३ कोटी उपलब्ध होणेस
२) वरील अनुषंगाने खात्याकडील सीई१९अे१७८ या बजेट हेड वर सदर तरतूद दरवर्षी उपलब्ध निविदा मुदतीच्या कालावधी पर्यंत उपलब्ध होणेस.

**विषय क्र. १२३२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/५२४ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे संदर्भ क्र. १० मा.स्थायी समिती ठ.क्र. १६१२ दि.४/१/२०१८ प्रमाणे कार्यवाही करणेस.
२. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली निवासी कराची २५ प्रकरणे व त्यांची माहे मार्च २०१८ अखेरची थकबाकी व २०१८–१९ ची मागणी अशी एकूण रक्कम रुपये८६,६२,५५६/– निर्लेखित करणे बाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.

३. सदरची निवासी कराची २५ प्रकरणे निर्लेखित केल्यानंतर नव्याने निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची कागदपत्र तपासून, जागा तपासणी करुन प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करुन त्याचा अहवाल मा.स्थायी समितीस मान्यतेसाठी सादर करणेस.

**विषय क्र. १२३३**

सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षाकरीता विद्यानिकेतन शाळांमधील इयत्ता ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थी वाहतुकीकरीता पी.एम.पी.एम.एल. कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार प्रति किलोमीटर रुपये ६८/– प्रमाणे देयके अदा करण्यास धोरणात्मक मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्रा)/५२७ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १२३४**

पुणे पेठ नारायण घरांक ३४३,३४७ वेलणकर शाळा,भानुविलास सिनेमा येथील वाहनतळाचे विनियोगाबाबत सदर ठेक्याची मुदत दि.२०.३.२०१६ रोजी संपुष्टात आल्याने टेंडर क्र.३०/२०१६ अन्वये जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता एकंदरित ११ वेळा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद मिळालेला नाही.

सदरच्या वाहनतळाबाबत ११ वेळा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने विदयमान (पूर्वीचे) ठेकेदार मे.कल्याणी एंटरप्रायझेस यांचेकडून वाहनतळ काढून घेतल्यास विनावापर राहून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून विदयमान ठेकेदार मे.कल्याणी एंटरप्रायझेस यांनी पूर्वीच्या ठेका रकमेमध्ये १०% व १२% प्रमाणे भाडेवाढ करून वाहनतळ चालविणेबाबत विनंती केल्यानुसार त्यांना वाहनतळ चालविण्यास देणे योग्य होईल. त्यानुसार दि.२०/३/२०१६ अखेर वार्षिक भाडे रक्कम रू.९,३८,४७५/– मध्ये १०% भाडेवाढ करून दि.२१/३/२०१६ ते २०/२/२०१७ अखेर सदरच्या वाहनतळापोटी वार्षिक भाडे रक्कम रूपये १०,३२, ३२३/– या प्रमाणे भरणा करून घेणेस, तसेच दि.२१/२/२०१७ ते २०/०१/२०१८ अखेर १०% भाडेवाढ करून वार्षिक भाडे र.रू.११,४६,९१५/– याप्रमाणे आणि तसेच दि.२१.१.२०१८ पासून पुर्वी १२% भाडेवाढ करून र.रू.१२,७१,८२२/– (वार्षिक भाडे) निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत परंतु ११ महिनेपेक्षा जास्त नाही या कालावधीसाठी सदरचा वाहनतळ चालविणेस देणेस व त्याप्रमाणे त्यांचेकडून या कालावधीसाठी भरणा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/३८३ दि.९/८/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७९ दि.५/९/२०१८ विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**